मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२

www.newsexpressmarathi.in » पुणे, पिंपरी-चिंचवड » बुधवार, दि. ०३ सप्टेंबर २०२५। पान १

# मुंबई-बंगळुरू महामार्गाच्या सेवा रस्त्यावरील खड्डे तातडीने बुजवा; खासदार श्रीरंग बारणे यांचे निर्देश

## महापालिका, एनएचआयच्या अधिकाऱ्यांसह रस्त्याची पाहणी; ५.५ हजार कोटी रुपयांच्या 'एलिव्हेटेड कॉरिडॉर'ला मंजुरी

**पिंपरी । प्रतिनिधी।**

**जुन्या पुणे-मुंबई महामार्गावरील देहूरोड येथील सेंट्रल चौक आणि मुंबई-बंगळुरू महामार्गावरील (देहूरोड-कात्रज) बाह्यवळण मार्गावरील किवळे समीर लॉन्स, ताथवडे, पुनावळे चौक, वाकड, भूमकर वस्ती या रस्त्याची मावळचे शिवसेना खासदार श्रीरंग बारणे यांनी मंगळवारी अधिकाऱ्यांसह पाहणी केली. सेवा रस्त्यावरील खड्डे तातडीने बुजविण्याचे निर्देश अधिकाऱ्यांना दिले. किवळे ते बालेवाडी स्टेडियमपर्यंत ८.३ किलोमीटर अंतरावर 'एलिव्हेटेड कॉरिडॉर'ची (उन्नत मार्ग) निर्मिती करण्यात येणार आहे. या साडेपाच हजार कोटी रुपयांच्या प्रस्तावाला महिन्याभरात मान्यता मिळेल, असेही त्यांनी सांगितले.**



> "एलिव्हेटेड कॉरिडॉर बालेवाडीपर्यंत जाणार आहे. पुनावळे, ताथवडे, हिंजवडीतून कॉरिडॉर जाणार आहे. या भविष्यात वाहतूक कोंडी होऊ नये, लोकांना त्रास होऊ नये यानुसार नियोजन करावे. मार्गावरील अंडरपासची रुंदी जास्त असावी. कर्व्ह असावे. महापालिकेच्या विकास आराखड्यात जेवढे रस्ते आहेत. तेवढेच अंडरपास ठेवण्यात यावेत.
> -श्रीरंग बारणे, खासदार

पिंपरी-चिंचवड महापालिका हद्दीतून मुंबई-बंगळुरू महामार्ग जातो. वाकड भूमकर चौक, ताथवडे व पुनावळेतील अंडरपास, किवळेतील मुकाई चौक आणि देहूरोड येथील सेंट्रल चौकात अनेकदा वाहतूक कोंडी होते. ती सोडविण्यासाठी एलिव्हेटेड कॉरिडॉर' मार्ग उभारण्यात येणार आहे. खासदार बारणे यांनी देहूरोड बाय पास जंक्शन ते वाकड चौक सेवा रस्त्याची पाहणी केली. महापालिका आयुक्त शेखर सिंह, राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाचे (एनएचआय) प्रकल्प संचालक संजय कदम, पिंपरी-चिंचवड महापालिकेचे शहर अभियंता मकरंद निकम, सहशहर अभियंता देवण्णा गट्टूवार, कार्यकारी अभियंता सुनिल पवार, कार्यकारी अभियंता सुनिल शिंदे, सहायक संचालक नगररचना संदेश खडतरे, शिवसेनेचे पिंपरी-चिंचवड शहर प्रमुख निलेश तरस, युवासेना मावळ लोकसभा प्रमुख राजेंद्र तरस उपस्थित होते.

खासदार बारणे यांनी देहूरोड वाय जंक्शन ते किवळे समीर लॉन्स, ताथवडे, पूनावळे चौक, वाकड, भूमकर चौकात जागेवर जाऊन प्रत्यक्ष पाहणी केली. या रस्त्यावर मोठे खड्डे पडले आहेत. याबाबत नागरिकांच्या तक्रारीं आहेत. ते खड्डे तातडीने बुजविण्याचे निर्देश खासदार बारणे यांनी दिले. खासदार बारणे म्हणाले, महामार्गाच्या दोन्ही बाजूला एनएचआय १२ मीटर सेवा रस्ता विकसित करणार आहे. जागेचे भूसंपादन झाले आहे. काही ठिकाणी महापालिकेच्या स्ट्रॉम वॉटरचे आउटलेट रस्त्यावर जात आहेत. त्यामुळेही खड्डयात भर पडली आहे. त्यामुळे आउटलेट तत्काळ वळवावे. उड्डाणपूल करण्यासाठी देहूरोड वाय जंक्शनचा भाग एनएचआयला हस्तांतरित करण्याबाबत एमएसआरडीसीला निर्देश दिले आहेत. सेवा रस्त्यावरील अंडरपासची रुंदी वाढवावी. कर्व्ह व्यवस्थित काढून द्यावेत. आराखडा तयार करून काम करावे. नागरिकांना कोणताही त्रास होता कामा नये, अशा सूचनाही खासदार बारणे यांनी दिल्या.

### किवळे ते बालेवाडी स्टेडियम पर्यंत ८.३ किलोमीटर अंतरावर 'एलिव्हेटेड कॉरिडॉर'

जुन्या पुणे-मुंबई महामार्गावरील देहूरोड येथील सेंट्रल चौक आणि मुंबई-बंगळुरू महामार्गावरील (देहूरोड-कात्रज बाह्यवळण मार्ग) किवळे मुकाई चौक, पुनावळे, ताथवडे, वाकड येथील भूमकर व भुजबळ चौकातील वाहतूक कोंडी लवकरच सुटणार आहे. किवळे ते बालेवाडी स्टेडियम पर्यंत ८.३ किलोमीटर अंतरावर 'एलिव्हेटेड कॉरिडॉर'ची (उन्नत मार्ग) निर्मिती करण्यात येणार आहे. हा 'कॉरिडॉर' केंद्र सरकारच्या रस्ते विकास मंत्रालयाच्या माध्यमातून केला जात आहे. साडेपाच हजार कोटी रुपयांच्या 'एलिव्हेटेड कॉरिडॉर'ला महिन्याभरात केंद्रीय मंत्रिमंडळाची मंजुरी मिळेल, असेही खासदार बारणे यांनी सांगितले.

# गणशोत्सव मंडळांचे देखावे पाहण्यासाठी नागरिकांची गर्दी

**पिंपरी। प्रतिनिधी।**

घरगुती गणपतींचे विसर्जन करून उद्योगनगरीतील पिंपरी, चिंचवड आणि भोसरीत सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांनी सोमवारी साकारलेले जिवंत आणि हलते देखावे पाहण्यासाठी गर्दी झाल्याचे दिसून आले. सामाजिक, राजकीय, धार्मिक, पौराणिक विषयावरील देखाव्यांवर भर दिला आहे, तर शहरातील मुख्य चौक आणि वाहतुकीचे नियोजन केले असून सोहळ्यावर



सीसीटीव्हीची असल्याचे दिसून आले. नजर पिंपरी-चिंचवड शहरात रविवारी गौरी आगमन झाले. त्यानंतर रात्री उपनगरातील देखावे पाहण्यासाठी भाविक घराबाहेर पडले होते. त्यामुळे प्रचंड गर्दीचा अनुभव आला. घराघरात गौरी पूजन केले. नैवेद्य दाखविला. सायंकाळी सातनंतर सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांनी देखावे खुले केले. शहरातील गणेश मंडळांनी यंदा सामाजिक संदेश देण्याबरोबरच सद्यः स्थितीवर आधारित विषयावरील हलते आणि जिवंत देखावे पाहण्यासाठी गर्दी झाली होती. या भागात होतेय गर्दी शहरातील गावठाणांच्या परिसरात गर्दी अधिक दिसून आली. भोसरी गावठाण, नेहरूनगर रस्ता, निगडी, आकुर्डी आणि चिंचवडगावातील गांधी पेठ, चापेकर चौक रस्ता, मोरया गोसावी मंदिर रस्ता, पिंपरी गावठाणातील रस्त्यावर गर्दी झाली होती.

### वाहतूक कोंडी रोखली, पोलिसांकडून बंदोबस्त

चौकातील रस्ते असले तरी वाहतूककोंडी होणार नाही, याची दक्षता मंडळांनी घेतली होती. मुख्य रस्त्यावरील गर्दी लक्षात घेता पोलिसांनी बंदोबस्त ठेवला आहे. रात्री जस-जशी गर्दी वाढू लागली तसे मध्यवर्ती भागात बॅरिकेड लावून वाहनांसाठी रस्ते बंद केले होते. सुरक्षिततेच्या कडेकोट बंदोबस्त होता. मध्यरात्री दोनपर्यंत वाहतूक सुरू ठेवली आहे. पीएमपीनेही फेऱ्या वाढविल्या आहेत.

# चिखलीतील संतपीठ शाळा महापालिकेने चालवावी

## विकासभाऊ साने सोशल फाऊंडेशनची मागणी

**चिखली । प्रतिनिधी।**

**चिखली- परिसरातील जगद्गुरु संतश्रेष्ठ तुकाराम महाराज संतपीठ शाळा पिंपरी-चिंचवड महापालिकेने थेट अधिपत्याखाली आणून मोफत व दर्जेदार शिक्षण सुरु करण्याती मागणी विकासभाऊ सोशल फाऊंडेशनच्या माध्यमातून करण्यात आली आहे. याबाबतचे निवेदन शहर अभियंता मकरंद निकम यांना देण्यात आले आहे.**




सध्या ही शाळा सीबीएसई पध्दतीने चालविली जात आहे. या शाळेची स्थापना वारकरी संप्रदायाचे संस्कार आणि मूल्यधिष्ठित आधुनिक शिक्षण देण्याच्या उद्देशा-ने करण्यात आली होती. मात्र प्रत्यक्षात विध्यार्थ्यांकडून २५ ते ४० हजार रूपये शुल्क आकारले जात असल्याने हे शिक्षण सर्वसामान्यांच्या आवाक्याबाहेरचे आहे.

महापालिका शाळांमध्ये शिक्षकांचे मानधन पालिकेकडून दिले जाते आणि विद्यार्थ्यांना मोफत शिक्षण दिले जाते. मात्र संतपीठ शाळेत मोठ्या प्रमाणात शालेय शुल्क आकारले जाते. त्यामुळे महापालिकेच्या इतर शाळा आणि संतपीठ शाळा यामध्ये स्पष्ट विरोधाभास निर्माण झाल्याचे नागरिकांचे मत असल्याचे विकास साने यांनी व्यक्त केले.

महापालिकेस दिलेल्या निवेदनात म्हटले की, हा प्रकल्प पालिकेने थेट ताब्यात घेऊन येथे मोफत व दर्जेदार शिक्षण उपलब्ध करून द्यावे. संतपीठ हे पालिकेच्या पायलट पोजेक्ट म्हणून ओळखले जाते. त्यामुळे येथे शिक्षणाची गुणवत्ता आणखी वाढवून सर्व स्तरांतील विद्यार्थ्यांना समान संधी मिळावी, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली आहे.

# आरती संग्रहातून नव्या पिढीला संस्कार - संतोष सौंदणकर...

## शिवसेनेच्या संतोष सौंदणकरांच्या तिसऱ्या गणपती आरती संग्रहाचे खा. श्रीरंग बारणे यांच्या हस्ते प्रकाशन...



**पिंपरी। प्रतिनिधी।**

शिवसेना शहर संघटक पिंपरी चिंचवड तथा महाराष्ट्र राज्य विद्युत सनियंत्रण समिती सदस्य संतोष रमाकांत सौंदणकर यांच्या तिसऱ्या गणपती आरती संग्रहाचे प्रकाशन रविवारी (दि. ३१) मावळ लोकसभा मतदारसंघाचे लोकप्रिय खासदार श्रीरंग (आप्पा) बारणे यांच्या हस्ते संपन्न झाले. यावेळी विविध मान्यवरांची उपस्थिती लाभली.

या प्रसंगी उपनेत्या सुलभाताई उबाळे, जिल्हा प्रमुख बाळासाहेब वाल्हेकर, उपजिल्हा प्रमुख सुनील हगवणे, उपशहरप्रमुख दिलीप पांढरकर, पुणे जिल्हा रेल्वे समिती सदस्य तथा पुणे जिल्हा सोशल मीडिया प्रमुख सुदर्शन देसले, विशाल राजपूत यांच्यासह अनेक पदाधिकारी व शिवसैनिक उपस्थित होते.

सौंदणकर यांचा हा तिसरा आरती संग्रह असून याआधी प्रकाशित झालेल्या संग्रहांना गणेशभक्तांकडून भरघोस प्रतिसाद मिळाला आहे.

खासदार श्रीरंग बारणे यांनी या उपक्रमाचे कौतुक करताना गणेशोत्सव हा सामाजिक, सांस्कृतिक आणि एकात्मतेचा उत्सव असल्याचे सांगितले. पारंपरिक भक्तिपूर्ण वातावरण निर्माण करणाऱ्या अशा आरती संग्रहांमुळे नव्या पिढीला संस्कार मिळतात आणि भक्तीबरोबरच समाजाभिमुखतेचा वारसा पुढे नेण्यास मदत होते, असे ते म्हणाले. यावेळी बोलताना संतोष सौंदणकर म्हणाले, "गणपती बाप्पा हे प्रेरणास्थान आहेत. त्यांच्या आरती व भजनांमधून समाजात भक्तीभावाबरोबरच चांगले विचार रुजावेत, हीच आमची इच्छा आहे. या आरती संग्रहाद्वारे नव्या पिढीपर्यंत ही परंपरा पोहोचवण्याचा प्रयत्न केला आहे.

# निघोजे बंधारा लवकच गाळमुक्त; यांत्रिकी पद्धतीने गाळ काढण्याचा पिंपरी महापालिकेचा निर्णय

**पिंपरी । प्रतिनिधी।**


इंद्रायणी नदीवरील निघोजे बंधाऱ्याची पाणी साठवण क्षमता वाढावी आणि स्वच्छ पाणी शहरवासीयांना मिळावे, यासाठी बंधाऱ्यातील गाळ यांत्रिकी पद्धतीने काढण्यात येणार आहे. पाण्याबरोबर वाहून येणाऱ्या कचऱ्यामुळे पंप बंद पडू नये, यासाठी उच्च दर्जाची चाळणी बसविण्याचा निर्णय महापालिकेने घेतला आहे. यासाठी दीड कोटींचा खर्च करण्यात येणार आहे.




पिंपरी-चिंचवड शहराला पवना धरणातून ५१०, आंद्रा धरणातून शंभर आणि एमआयडीसीकडून २० असा ६३० दशलक्ष लीटर (एमएलडी) पाणी पुरवठा दररोज केला जातो. शहराची लोकसंख्या वाढत असताना पाण्याची मागणीही वाढत आहे. त्यामुळेच भामा आसखेड धरणातून १६७ आणि आंद्रा धरणातून शंभर असे २६७ दशलक्ष लीटर पाणी शहरासाठी राखीव करण्यात आले आहे. पहिल्या टप्प्यात आंद्रा धरणातून पाणी शहराला मिळण्यास सुरूवात झाली आहे. आंद्रा धरणातून शंभर दशलक्ष लीटर पाणी इंद्रायणी नदीत सोडून महापालिका निघोजे येथील बंधाऱ्यावरून उचलते. या पाण्यावर चिखलीतील जलशुद्धीकरण केंद्रात प्रक्रिया केल्यानंतर भोसरी, चिखली, मोशी, चऱ्होली आदी समाविष्ट गावांना दिले जात आहे. निघोजे बंधारा परिसरात मोठ्या प्रमाणात गाळ जमा झाला आहे. शेवाळ तयार झाले आहे. पुरेशा प्रमाणात पाणी साठा होत नसल्याने या बंधाऱ्याच्या परिसरात साचलेला गाळ काढण्याचा निर्णय महापालिकेने घेतला आहे. निघोजे बंधाऱ्याच्या गाळामुळे पाणी साठा कमी होत आहे. यामुळे बंधाऱ्यातील गाळ यांत्रिक पद्धतीने काढण्यात येणार आहे.

# पिंपरीत गणेशमूर्ती विसर्जन घाटांवर वैद्यकीय पथके

**पिंपरी । प्रतिनिधी।**



पिंपरी-चिंचवड महापालिकेकडून गणेशमूर्ती विसर्जन घाटांवर वैद्यकीय पथके, रुग्णवाहिका सज्ज ठेवली आहे. आरोग्य विभागामार्फत शहरातील प्रमुख विसर्जन स्थळांवर निर्माल्य संकलन कुंडांची व्यवस्था करण्यात आली आहे. विसर्जन घाटांवर तैनात करण्यात आलेल्या विशेष वैद्यकीय पथकात वैद्यकीय अधिकारी, परिचारिका, मदतनीस, रुग्णवाहिका चालक व सफाई कर्मचारी यांचा समावेश आहे. या पथकांना मुबलक औषधसाठा, आवश्यक ते सर्व वैद्यकीय साहित्य, तसेच सुसज्ज रुग्णवाहिका उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. मुख्य समन्वयक म्हणून सहायक आरोग्य वैद्यकीय अधिकारी डॉ. किशोरी नलावडे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. प्राधिकरणातील गणेश तलाव, वाल्हेकरवाडीतील जाधव घाट, काळेवाडी स्मशान घाट, पिंपरीतील सुभाषनगर घाट, वाकड गावठाण घाट, मोशी नदी घाट, चिखली स्मशान घाट, केजुदेवी बंधारा घाट, सांगवी घाट आणि पिंपळे गुरव येथील घाटावर वैद्यकीय पथक सज्ज ठेवण्यात आले आहे.